आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१५ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सत्तेत आल्यावर महाविकास आघाडी आरक्षण हटवेल असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा दावा

- सत्तेत आल्यावर शेतकरी आत्महत्या थांबवण्याचं शरद पवार यांचं आश्वासन, ७ हजार रुपये क्विंटल दराने सोयाबीन खरेदीची मल्लिकार्जून खर्गे यांची घोषणा

- वायू प्रदुषणाच्या वाढत्या पातळीमुळे दिल्लीतल्या सर्व प्राथमिक शाळा आजपासून ऑनलाईन

- श्रीलंकेत संसदेच्या निवडणुकांमध्ये नॅशनल पीपल्स पॉवर या पक्षाला पुन्हा बहुमत

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी ट्वेन्टी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज रात्री

**<><><><><>**

काँग्रेस आणि महाविकास आघाडी सत्तेत आली तर आरक्षण हटवेल, असा आरोप प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल मुंबईत शिवाजी पार्कवर घेतलेल्या सभेत केला. अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी यांची एकजूट तोडण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. हे लोक आपापसात लढले तर काँग्रेस मजबूत होईल, असा दावा त्यांनी या सभेत केला. सर्व राजकीय पक्षांनी विचारसरणी पेक्षा देशाला अधिक प्राधान्य द्यावं असं आवाहन त्यांनी केलं. या विधानसभा निवडणुकीतील प्रधानमंत्र्याची ही राज्यातील शेवटची प्रचारसभा होती. यावेळी त्यांनी जमलेल्या

कार्यकर्त्यांना महायुतीच्या उमेदवारांना जिंकून देण्याचं आवाहन केलं आणि महायुती सरकारच्या शपथविधीचे आमंत्रण दिले.

मुंबई हे स्वप्नांचं शहर आहे आणि महायुती मुंबईकरांचे स्वप्न पूर्ण करेल असं आश्वासन मोदी यांनी दिलं. काँग्रेसच्या सरकारच्या काळात त्यांनी मुंबईच्या भविष्याचा विचार केला नाही. पण आम्ही मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी काम करत आहोत, असं ते म्हणाले.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येत्या काही वर्षात मुंबईचा GDP दुप्पट करण्याचं आश्वासन दिलं. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला विरोध करणारे आता तशाच पद्धतीच्या योजनेचं आश्वासन देत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

येत्या ५-१० वर्षात धारावीचा माणूस तिथेच पक्क्या घरात राहील, असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिलं. केंद्रीय मंत्री पियूष गोयल, रामदास आठवले यांच्यासह शिवसेना भाजपचे मुंबईतले उमेदवार यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

**<><><><><>**

महाविकास आघाडी सरकार ७ हजार रुपये प्रति क्विंटल दराने सोयाबीन खरेदी करेल, असं आश्वासन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी दिलं आहे. पुण्यात काल वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. कांद्याच्या दरासंदर्भात एक समिती स्थापन करणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

**<><><><><>**

सत्ता आपल्याला मिळाली तर राज्यातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवू आणि त्यांच्या मालाला योग्य किंमत देऊ, असं आश्वासन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी काल पुणे इथल्या मविआ उमेदवारांसाठीच्या प्रचारसभेत दिलं. राज्यातल्या महिलांना सुरक्षितता मिळवून देणं, शेतकऱ्यांना आत्महत्यांपासून रोखणं, तरुणांना रोजगार मिळवून देणं हे आपलं उद्दिष्ट असून त्यासाठी मतदारांनी साथ द्यावी असं आवाहनही पवार यांना या सभेत केलं. भाजपाच्या राज्यात सहाव्या क्रमांकावर आलेला महाराष्ट्र पुन्हा पहिल्या क्रमांकावर आणू असं आश्वासनही पवार यांना या सभेत दिलं.

**<><><><><>**

विधानसभेची यंदाची निवडणूक राज्यावर प्रेम करणारे आणि राज्याची लूट करणारे यांच्यातली लढाई आहे. महाराष्ट्राची लूट होऊ न देता त्याच्या रक्षणासाठी लढणार असल्याचं प्रतिपादन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल छत्रपती संभाजीनगरमध्ये केलं. औरंगाबादचं नामांतर केल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा दावा चुकीचा आहे. मी मुख्यमंत्री असताना हा निर्णय घेतला होता, असं ते म्हणाले. चिखलठाणा विमानतळाला अजून संभाजी महाराजांचं नाव का दिलं नाही, असा सवाल त्यांनी केला.

**<><><><><>**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी  त्यांच्या पक्षाचा जाहीरनामा आज मुंबईत प्रसिद्ध केला. गेल्या १९वर्षात आम्ही काय केलं यावरची पुस्तिकाही त्यांनी आज प्रसिद्ध केली. गडकिल्ल्यांचे संवर्धन करणे गरजेचे असून शिवरायांच्या मंदिरापेक्षा विद्या मंदिर बांधणे महत्वाचे आहे, असं राज ठाकरे यांनी

यावेळी स्पष्ट केलं. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत मराठी भाषा अनिवार्य असायला हवी, अशी भूमिका त्यांनी या जाहीरनाम्यात मांडली आहे. येत्या १७ नोव्हेंबरला शिवाजी पार्क मैदानावर मनसेच्या सभेसाठी अद्याप परवानगी मिळालेली नाही. वेळ अपुरा असल्याने ही सभा न घेता मतदार संघांना भेटी देण्यात येतील, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला सर्वांनी मतदान करावं असं आवाहन अभिनेता कैलास वाघमारे यांनी केलं आहे......

**होल्ड बाईट....**

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज सातारा जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज जमुई इथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून जनजाती गौरव दिवसाच्या निमित्ताने ६ हजार ६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या अनेक विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. पीएम-जनमन योजनेअंतर्गत बांधलेल्या ११ हजार घरांचा गृहप्रवेशही त्यांनी यावेळी केला. तसंच, त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंती वर्षाचा प्रारंभ करताना बिरसा

मुंडा यांच्या जीवनावर आणि समृद्ध आदिवासी वारसा तसंच संस्कृतीवर आधारित प्रदर्शनाचं उद्घाटनही केलं. यासोबत त्यांनी दोन आदिवासी स्वातंत्र्य सैनिक संग्रहालयं तसंच दोन आदिवासी संशोधन संस्थांचंही उद्घाटन केलं.

<><><><>

दिल्ली एनसीआर भागातल्या हवेची गुणवत्ता अतिशय गंभीर स्थितीत असून आज सकाळचा हवा गुणवत्ता निर्देशांक ४२० इतक्या अतिगंभीर स्थितीत होता. पुढचे दोन दिवस त्यात धुक्याची भर पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

वायू प्रदुषणाच्या वाढत्या पातळीमुळे नवी दिल्लीतल्या सर्व प्राथमिक शाळा आजपासून पुढचे आदेश येईपर्यंत ऑनलाईन तत्वावर चालवल्या जातील असे निर्देश दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून दिले आहेत. हवेचं दर्जामापन करणाऱ्या समितीने दिलेल्या इशाऱ्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

<><><><>

यंदा एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत भारताच्या निर्यातीत एकूण ७ पूर्णांक २८ शतांश टक्क्याची म्हणजेच ४६८ अब्ज २७ कोटी डॉलर्सची वाढ झाली आहे. गेल्या वर्षी याच काळात ही वाढ ४३६ अब्ज ४८ कोटी डॉलर्स इतकी नोंदवली गेली होती.

<><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुरु नानक जयंतीनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु नानक यांनी आपल्याला कठोर परिश्रमावर आधारित अध्यात्माचा मार्ग दाखवला, तसंच

सत्य, समाधान, दया आणि प्रेमावर आधारित समाज कसा निर्माण करायचा हे शिकवलं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. गुरुनानक यांनी सांगितलेल्या सत्य, शांतता आणि एकतेच्या तत्त्वांसाठी लोकांनी स्वतःला समर्पित करावं, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. तर गुरु नानक यांची शिकवणूक आपल्याला करुणा, दया आणि नम्रतेची मार्गावर चालण्यासाठी प्रेरणा देते, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

श्रीलंकेत नॅशनल पीपल्स पॉवर या पक्षानं संसदीय निवडणुकांमध्ये पुन्हा बहुमताचा आकडा पार केला आहे. अजून मतमोजणी सुरू असली तरी आतापर्यंत संसदेच्या निवडणुकीतल्या १७१ पैकी १४१ जागा या डाव्या आघाडीला मिळाल्या आहेत. त्यामुळं राष्ट्रपती दिसा नायके यांना संसदेचं मजूबत पाठबळ मिळेल. २२५ सदस्यीय संसदेतल्या २९ नामनिर्देशित सदस्यांमध्येही याच पक्षाच्या सदस्यांना अधिकाधिक जागा मिळण्याची शक्यता आहे. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या समागी जन बलवेगाया या सजित प्रेमदासा यांच्या पक्षाला आतापर्यंत ३५ जागा मिळाल्या आहेत. माजी अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे यांच्या न्यू डेमॉक्रेटिक फ्रंटला केवळ ३ जागा मिळाल्या आहेत.

श्रीलंकेत काल झालेल्या मतदानात ६५ टक्के मतदारांनी मतदान केलं होतं.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी ट्वेन्टी क्रिकेट मालिकेतला चौथा आणि शेवटचा सामना आज रात्री होणार आहे. जोहान्सबर्गच्या वांडरर्स स्टेडियमवर रात्री साडे आठ वाजता सुरू होईल.

//<><><><><>//